**कृपया प्रसिध्दीसाठी -** **5 ऑक्टोबर 2009**

**भारतीय जनता पार्टीचे नेते व माजी केंद्रिय मंत्री श्री.राम नाईक यांनी**
**सोमवार, 5 ऑक्टोबर 2009 रोजी मुंबईत पत्रकार परिषदेमध्ये वितरीत केलेले निवेदन**

***वाढती महागाई काँग्रेस आघाडीचा पराभव करेल : राम नाईक***

**मुंबई, सोमवार** : "केंद्र सरकारवर अंकुश ठेवून महाराष्ट्रासाठी जनहिताचे निर्णय घ्यायला लावण्यासाठी महाराष्ट्राचे भवितव्य भाजपा-शिवसेनेकडेच सोपविले पाहिजे याची जाणीव जनतेला झाली आहे," असे प्रतिपादन भाजपा नेते व माजी केंद्रिय मंत्री श्री.राम नाईक यांनी केले. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी मुंबईच्यावतीने आयोजित पत्रकार परिषदेत श्री.राम नाईक बोलत होते.

**वाढती महागाई :**

विधानसभा निवडणुकीतील सर्वात महत्त्वाचा मुद्दा हा वाढत्या महागाईचा भस्मासूर हाच आहे. दिवाळी तोंडावर आली आहे पण सामान्य माणूस खरेदीला जाण्याची हिंमत करु शकत नाही अशी आज परिस्थिती आहे. या महागाईला काबूत ठेवण्याचे काम भाजपा-शिवसेना सरकार प्रभावीरीत्या करेल तसेच गहू, तांदूळ, गोड तेल, साखर आणि तूर डाळ यांच्या किंमती आगामी पाच वर्षांसाठी स्थिर ठेवण्यात येतील असे सांगून गेल्या पाच वर्षात वाजपेयी सरकारच्या तुलनेत जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती कशा वाढल्या त्याचा तक्ताच श्री.राम नाईक यांनी प्रसिध्द केला. त्या तक्त्याप्रमाणे मे 2004 मध्ये गहू रु.9 किलो होता तो आता रु.18 (100 टक्के), तांदूळ रु.10 वरुन रु.24 (140 टक्के), साखर रु.14 वरुन रु.34 (142 टक्के), गूळ रु.14 वरुन रु.42 (200 टक्के), तूर डाळ रु.30 वरुन रु.90 (200 टक्के), गोड तेल रु.40 वरुन रु.88 (120 टक्के), बटाटे रु.8 वरुन रु.20 (150 टक्के) तर कांदे रु.6 वरुन रु.20 (233 टक्के) वाढल्याचे स्पष्ट होते आहे. महागाईमुळे संतप्त झालेली जनता काँग्रेस आघाडी सरकारचा पराभव करेल असा विश्वास श्री.राम नाईक यांनी व्यक्त केला.

**उपनगरी रेल्वे :**

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईकरांच्या दैनंदिन प्रवासाच्या अडीअडचणींवर केंद्र सरकार प्रभावी तोडगा काढू शकते. पण ना केंद्रातील काँग्रेस सरकारला मुंबईची फिकीर आहे ना राज्यातील आघाडी सरकारला मुंबईकरांची चिंता आहे. ही परिस्थिती भाजपा-शिवसेना युतीचे सरकार बदलेल अशी ग्वाही देऊन श्री.राम नाईक म्हणाले, "खरं तर रेल्वे ही मुंबईची जीवनरेषाच ! परंतु प्रचंड गर्दीतून रोज प्रवास करणा-या 65 लाख प्रवाशांना गेल्या पाच वर्षात कोणताही दिलासा केंद्र सरकारने दिला नाही. वाजपेयी सरकारने हाती घेतलेले प्रकल्पही रखडविले. मुंबईतील उपनगरी रेल्वे प्रवासाचा दर्जा सुधारण्यासाठी एमयुटीपी I अंतर्गत रु.4,500 कोटींचे प्रकल्प केंद्रातील भाजपा सरकारने मुंबई रेल्वे विकास महामंडळाद्वारे आखले. राज्य सरकारला या प्रकल्पांची अंमलबजावणी करुन घेता येणे सहज शक्य होते, कारण मुंबई रेल्वे विकास महामंडळ हे भारतीय रेल्वे व महाराष्ट्र सरकार यांच्या 50-50 टक्के भागीदारीत स्थापन केले आहे. परंतु राज्यातील काँग्रेस आघाडी सरकारने या प्रकल्पांची अंमलबजावणी होते आहे किंवा काय याकडे ढुंकूनही पाहिले नाही." भाजपा-शिवसेना युतीचे सरकार मुंबईकरांसाठी मुंबई रेल्वे विकास महामंडळाच्या सर्व योजना तातडीने पूर्ण करण्यास अग्रक्रम देईल, असे प्रतिपादन श्री.नाईक यांनी केले. एमयुटीपी I बरोबरच रु.5,300 कोटींचा एमयुटीपी II या दोन्ही योजनांना आम्ही प्राधान्य देऊ असेही श्री.नाईक म्हणाले.

**मेट्रो रेल्वे :**

मेट्रो रेल्वे प्रकल्पांतील गैर प्रकारांबाबत श्री.राम नाईक राज्य सरकारलाच दोषी मानतात. मेट्रो रेल्वे राज्य सरकारच्या अखत्यारीत येत असल्याने मेट्रो रेल्वेचे प्रकल्प सुरु करण्यापूर्वीच जनतेच्या हिताचे पुनर्वसन धोरण आखणे आवश्यक असूनही काँग्रेस-राष्ट्रवादीच्या राज्य सरकारने ते केले नाही याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करुन श्री.नाईक म्हणाले, "युतीचे सरकार सर्वप्रथम पुनर्वसन धोरण ठरवेल व मगच मेट्रो रेल्वे प्रकल्प शीघ्र गतीने कसे पूर्ण होतील याकडेही लक्ष ठेवेल. वर्सोवा-घाटकोपर मेट्रो रेल्वे मार्गाचे रेंगाळलेले काम प्राध्यान देऊन पूर्ण करु, तसेच चारकोप-बांद्रे-मानखुर्द मेट्रो मार्गाचे खुद्द राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील यांनी भूमिपूजन करुनही अद्याप काम का सुरु झाले नाही याची चौकशी करु." मात्र चारकोपची प्रस्तावित कारशेड हलविल्याखेरीज आम्ही या मार्गाचे काम सुरु करु देणार नाही असेही श्री.नाईक यांनी बजावले.

**वन जमीन :**

पश्चिम व पूर्व उपनगरांमध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाला लागून तथाकथित वनभूमीवर राहाणारे लाखो नागरीक आहेत. या जमिनीवर जशा झोपडपट्ट्या उभ्या राहिल्या, तशाच काँग्रेस सरकारच्या भोंगळ कारभारामुळे आयुष्यभराची पूंजी खर्च करुन, सर्व शासकीय अटी पूर्ण करुन फ्लॅट विकत घेऊन इमारतींमधून राहाणारीही हजारो कुटुंबे आहेत. यातील कोणावरही बेघर होण्याची पाळी भाजपा-शिवसेना सरकार येऊ देणार नाही. त्यासाठी सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्र सरकारची भूमिका यशस्वीपणे मांडून कायद्यात आवश्यक ते बदल करण्यात येतील, असेही श्री.राम नाईक यांनी सांगितले.

**महानगर गॅस :**

वाजपेयी सरकारच्या काळात श्री.राम नाईक यांच्याकडे पेट्रोलियम मंत्री पद होते. त्यावेळी लक्षावधी कुटुंबांना महानगर गॅसच्या कमी खर्चाच्या व अधिक सुरक्षित पाईप गॅसच्या जोडण्या देण्यात आल्या. महानगर गॅसमध्येही महाराष्ट्र सरकारचाही सहभाग आहे. संपूर्ण मुंबईभर हे पाईप गॅसचे जाळे विस्तारावे यासाठी राज्य सरकारने आग्रही भूमिका घ्यायला हवी होती. विद्यमान पेट्रोलियम मंत्री श्री.मुरली देवरा मुंबईकरच असूनही गेल्या पाच वर्षात नव्या जोडण्या देण्याचे काम मंदावले. सर्व नागरिकांना लवकरात-लवकर पाईप गॅस मिळावा, दोन-दोन वर्ष पैसे भरुन वाट पाहाणा-यांना तर तात्काळ पाईप गॅस मिळावा यासाठी भाजपा-शिवसेना आग्रही भूमिका घेईल, असेही श्री.राम नाईक यांनी सांगितले.

**(विवेकानंद गुप्ता)**
**प्रसिध्दी प्रमुख**
**9869233624**

**संलग्न : महागाईचे पत्रक.**

*जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किंमती*

**(किंमती मुंबईच्या दुकानातील आहेत.- संकलक श्री.राम नाईक)**

| वस्तू | भाजपा सरकारच्या काळातील दर (प्रति किलो रु.) मे 2004 | काँग्रेस सरकारच्या काळातील दर (प्रति किलो रु.) 1 ऑक्टोबर 2009 | वाढ (% टक्के) |
|---|---|---|---|
| गहू | 9 | 18 | 100% |
| तांदूळ | 10 | 24 | 140% |
| साखर | 14 | 34 | 142% |
| चहा पावडर | 80 | 200 | 150% |
| खाद्य तेल | 40(प्रति लिटर) | 88(प्रति लिटर) | 120% |
| डालडा | 40 | 60 | 50% |
| तूर डाळ | 30 | 90 | 200% |
| मुग डाळ | 24 | 68 | 183% |
| मसूर डाळ | 22 | 68 | 209% |
| चणा डाळ | 25 | 45 | 80% |
| गूळ | 14 | 42 | 200% |
| बेसन | 20 | 45 | 125% |
| बटाटा | 8 | 20 | 150% |
| कांदा | 6 | 20 | 233% |
| टोमॅटो | 9 | 12 | 33% |
| दूध | 14 (प्रति लिटर) | 25(प्रति लिटर) | 78% |
| केरोसीन | 18 (प्रति लिटर) | 35(प्रति लिटर) | 94% |
| स्वयंपाकाचा गॅस | 244 (प्रति सिलेंडर) | 314.00(प्रति सिलेंडर) | 29% |
| पाइप नैसर्गिक गॅस | 11.53 (प्रति एससीएम) | 13.60 (प्रति एससीएम) | 18% |
| पेट्रोल | 33.15 (प्रति लिटर) | 48.78 (प्रति लिटर) | 47% |
| डिझेल | 22.50 (प्रति लिटर) | 36.74 (प्रति लिटर) | 63% |
| सीएनजी | 19.71 (प्रति किलो) | 24.65 (प्रति किलो) | 25% |

**महागाई इतकी कडाडली असताना सरकारच्या महागाई निर्देशांकात मात्र घट दाखविली असून तो अवघा (-) ०.83 आहे. याचं कारण ग्राहक मूल्य निर्देशांक काढण्याची पूर्वीची पध्दत बंद करुन तो आता घाऊक किंमतीवर काढायला काँग्रेस सरकारने सुरुवात केली आहे. यामुळे देशाच्या आर्थिक स्थितीचे चुकीचे चित्र दाखविले जात आहे. प्रत्यक्षात महागाई वाढत असल्याने सरकारी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ताही सरकारने वाढविला आहे. महागाई बरोबरच देशात मंदीचे सावटही पसरले आहे. ही संकटे कमी होती की काय म्हणून आता बहुधा दुष्काळाचा सामना करायला लागेल अशी चिन्हे दिसत आहेत.**

**काँग्रेस आघाडी सरकार सुस्त आणि संवेदनाहीन बनले आहे. महागाई वाढविणा-या या सरकारची आता हकालपट्टीच करायला पाहिजे.**